# मुंबई विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

वेबसाईट :-www.nssmu.org
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**


पत्र.क्र.रासेयो/ईसीडी/२०२३-२४/९३९
दिनांक : ०२.११.२०२३

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मुंबई विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालये.

**विषय** : दक्षता जनजागृती सप्ताह—२०२३ (Vigilance Awareness Week-2023)

संदर्भ : १. अपर पोलीस आयुक्त, पत्र क्र. जा.क्र.६४२/अपोआ/लाप्रवि/बृमंवि/दजस-२३/२०२३, दिनांक २०.१०.२०२३ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

दिनांक ३०.१०.२०२३ ते ०५.११.२०२३ या कालावधीत ''भ्रष्टाचाराला नाही म्हणा; राष्ट्रासाठी वचनबध्द व्हा'' "Say no to corruption; commit to the Nation" या विषयावर (Theme) आधारीत दक्षता जनजागृती सप्ताह -२०२३ (Vigilance Awareness Week-2023) देशभर साजरा करण्यात येणार आहे भ्रष्टाचार हा विकास कामातील सर्वांत मोठा अडथळा आहे. भ्रष्टाचारामुळे समाजाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी महाविद्यालय पातळीवर दक्षता जनजागृती सारखे उपक्रम केवळ आठवडाभर न राबविता नियमितपणे राबविले गेले पाहिजे.

दक्षता जनजागृती सप्ताह-२०२३ च्या निमित्ताने महाविद्यालयांमध्ये बंदिस्त हॉलमध्ये किंवा ऑनलाईन व सोशल मिडीया पध्दतीचा वापर करुन ''भ्रष्टाचाराला नाही म्हणा; राष्ट्रासाठी वचनबध्द व्हा'' "Say no to corruption; commit to the Nation" या विषयावर आधारीत चर्चासत्रे / वादविवाद स्पर्धा / व्याख्याने/ निबंध स्पर्धा इत्यादींचे आयोजन करुन विद्यार्थ्यांमध्ये भ्रष्टाचार निर्मुलनाच्या दृष्टीने जागरुकता निर्माण करण्यात यावी, तसेच केंद्रीय सतर्कता आयोगाच्या www.pledge.cvc.in या संकेतस्थळावर भ्रष्टाचार निर्मुलन प्रतिज्ञा घेण्यासंदर्भात सर्व विद्यार्थ्यांना अवगत करावे.

याकरीता आपणांस काही मदतीची आवश्यकता भासल्यास कृपया समन्ययक अधिकारी श्री. निलेश प्रमोद साळुंखे पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त, ला.प्र.वि., मुंबई विभाग, Mobile No. 7977531508, 9594441896 यांचेशी संपर्क साधावा.

**आपला**

**सुशील शिंदे**
**विशेष कार्य अधिकारी, (रा.से.यो.)**

-sd-
**सुधीर पुराणिक**
**संचालक, रा.से.यो., मुंबई विद्यापीठ**